नि.क्र.१९/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

माझे नाव - आसावरी विशाल म्हात्रे, सध्याचे नाव- प्रियंका प्रकाश वेळे,
वय - ३६ वर्षे
हुद्दा - म.पो.ह. / ब.नं. ७५,
नेमणूक - कर्जत पोलिस स्टेशन

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) मी रसायनी पोलिस स्टेशन येथे महिला पोलिस हवालदार या पदावर सन २०१८ ते जुन २०२५ या कालावधीमध्ये कार्यरत होते. दि. २४/०२/२०२४ रोजी मी स्वतः ठाणे अंमलदार म्हणून ड्युटीवर होते. त्या दिवशी मी ड्युटीवर असताना फिर्यादी साक्षी समीर पारंगे हिने दिलेली फिर्याद मी गु.र.क्र. २९/२०२४ भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे नोंद करुन घेतली. त्यानंतर सदर गुन्ह्याचा तपास वरीष्ठांच्या तोंडी आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. सदरचा गुन्हा माझ्याकडे तपासासाठी आल्यानंतर मी चोरीला गेलेल्या मोबाईलचे सी.डी.आर. प्राप्त करुन घेतले व ते दोषारोपपत्रात सामील करुन घेतले. मी सी.डी.आर. व एस.डी.आर. मिळणेबाबत पोलिस अधिक्षक कार्यालय सायबर सेल यांना पत्र दिले होते. आता मला दाखवण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पत्रास **निशाणी २०** देण्यात आली. त्यानंतर मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ मौजे कांबे गावच्या हद्दीत, रीस कांबे रोडवर रमेश टावरे यांच्या घरासमोर रोडवर होते. पंचांची नावे पराग दिपक म्हात्रे व संतोष गोपाळ म्हात्रे अशी होती. पंचनाम्याच्या वेळी घटनास्थळ फिर्यादी साक्षी समीर पारंगे यांनी आम्हाला दाखवले. पंचनाम्याच्या वेळी फिर्यादी यांनी त्यांचा रिअलमी कंपनीचा ८ एस मॉडेलचा मोबाईल अंदाजे किंमत रु. १२,०००/- हा ज्या ठिकाणावरुन चोरीला गेला होता ते ठिकाण दाखवले. त्यानुसार मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला निशाणी १५ वरील पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांच्या सह्या

आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनामा निशाणी १५ वर आहे. पंचनाम्याच्या वेळी आम्ही फोटो काढले होते. आता मला दाखवण्यात आलेले फोटो तेच आहेत. फोटोंना **आर्टीकल अ** व **आर्टीकल ब** देण्यात आले. सदरचे फोटो हे पोलिस शिपाई भडाळे यांनी काढले होते. त्यानुसार मी पोलिस शिपाई भडाळे यांचे ६५-ब नुसारचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवून ते दोषारोप पत्रात सामिल करुन घेतले. त्यानंतर मी चोरीला गेलेल्या मोबाईलचे बील दोषारो पत्रात सामिल करुन घेतले. त्यानंतर मी सी.डी.आर. चे अवलोकन करुन ज्या व्यक्तीच्या ताब्यात मोबाईल मिळून आला त्याचे टिपण नोंदवले. त्या व्यक्तीचे नाव गुदशनकूमार गौतम असे होते. सदर व्यक्तीने त्याचे टिपण नोंदवताना असे सांगितले की, दि. २२/०२/२०२४ रोजी त्याचा मोबाईल बंद पडल्याने तो दुरुस्त करण्यासाठी मोहोपाडा येथे आलेले असताना त्याचा मित्र संकेत कुरंगळे याने त्यांना त्याचा मोबाईल वापरण्याकरीता दिला होता. त्यानंतर पोलिस स्टेशन मधुन कॉल गेल्यानंतर त्याला समजले की, तो मोबाईल चोरीचा आहे. त्यानंतर मी दि. २५/०२/२०२४ रोजी आरोपी संकेत कुरंगळे याला चौकशीकामी हजर राहण्याबाबत समजपत्र दिले. आता मला दाखवण्यात आलेले समजपत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. समजपत्रास **निशाणी २१** देण्यात आली. त्यानंतर मी दोन पंचांसमक्ष आरोपीने हजर केलेला रिअलमी कंपनीचा ८ एस मॉडेलचा मोबाईल जप्त केला. त्यानुसार मी दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. जप्ती पंचनाम्यास **निशाणी २२** देण्यात आली. सदर पंचनाम्याच्या वेळी पोलिस शिपाई भडाळे यांनी फोटो काढले होते. आता मला दाखवण्यात आलेले फोटो तेच आहेत. फोटोंना आर्टीकल सी व डी देण्यात आले. त्यानंतर मी जप्त मुद्देमाल पावतीने पोलिस स्टेशन मध्ये जमा केला. आता मला दाखवण्यात आलेली मुद्देमाल पावती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मुद्देमाल पावतीस **निशाणी २३** देण्यात आली. त्यानंतर मी पोलिस शिपाई भडाळे यांचे ६५-ब नुसारचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले. त्यानंतर मी फिर्यादीचा पुरवणी जबाब नोंदवला.

त्यानंतर मी साक्षीदार दिपीका म्हात्रे व दिपक म्हात्रे यांचे जबाब नोंदवले. मी केलेल्या तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, सदरचा मोबाईल हा आरोपी संकेत कुरंगळे याने चोरी केलेला आहे. त्यामुळे मी त्याच्या विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र पाठवले. आरोपीला पाहील्यास मी ओळखू शकते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. अभिषेक पाटील यांचेमार्फत सुरु...**

२) हे म्हणणे खरे आहे की, मी रसायनी पोलिस स्टेशन येथे बरेच दिवस कार्यरत असल्यामुळे मला रसायनी परीसराची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ रहदारीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटना दि. २६/०१/२०२४ रोजी घडलेली असून फिर्यादीने फिर्याद दि. २४/०२/२०२४ रोजी दिलेली आहे. मी घटनास्थळावरील रीस ते कांबे जाणा-या रोडवरील सीसीटीव्ही कॅमे-याची पाहणी केली नाही. मी घटनास्थळाजवळील घरामधील लोकांकडे कसलीही चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, रिस नाक्यापासून घटनास्थळापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुला इमारती, दुकाने तसेच रहीवासी घरे आहेत. दि. २६/०१/२०२४ रोजी फिर्यादी किंवा त्यांच्या घरातील कोणीही मोबाईल चोरीला गेल्याबाबत आमच्या पोलिस स्टेशनला प्रत्यक्ष येवून किंवा फोनद्वारे कसलीही माहिती दिली नव्हती. ज्या वेळी फिर्याद दिली त्यावेळी फिर्यादीने चोरी करणा-या व्यक्तीचे कोणतेही वर्णन आम्हाला सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद अज्ञात व्यक्तीविरुध्द देण्यात आलेली असून फिर्यादीने फिर्याद देते वेळी तिला तिचा मोबाईल संकेत कुरंगळे याने चोरला असल्याचा संशय आहे असे काही सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रत्येक मोबाईल आय.एम.ई.आय. नंबर वेगवेगळा असतो. हे म्हणणे खरे आहे की, एकाच आय.एम.ई.आय. नंबरचे वेगवेगळे मोबाईल नसतात. हे म्हणणे खरे आहे की, मॉडेल व रंग एक सारखा असलेले अनेक मोबाईल असू शकतात. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १० वरील फिर्यादी नुसार चोरीला गेलेल्या मोबाईलचा आय.एम.ई.आय. नंबर ८६०९७१०५९१५७०७७४ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी १२ वरील

मोबाईलच्या बिलावरील आय.एम.ई.आय. नंबर व फिर्यादी मधील आय.एम.ई.आय. नंबर हे वेगवेगळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सी.डी.आर. रिपोर्ट मध्ये चोरीला गेलेल्या मोबाईल मध्ये संकेत कुरंगळे यांच्या नावाचे सीमकार्ड आहे असे कोठेही दिसून आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, गुदशन कुमार यांना वगळता उर्वरीत साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गुदशन कुमार यांच्या जबाबामध्ये आम्ही त्यांना त्यांचा जबाब कोणत्या भाषेमध्ये समजावून सांगितला हे नमूद नाही. मी गुदशन कुमार यांना मराठी भाषा समजते तसेच बोलता येते हे दाखवणारे कोणतेही प्रमाणपत्र मी त्यांच्याकडून मिळवले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्यास २९ ते ३० दिवसांचा विलंब झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, विलंबाचे कारण दोषारोप पत्रामध्ये कोठेही नमूद नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, फिर्यादीमध्ये कारण नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हॉस्पीटलच्या कामात व्यस्त होती हे दाखवणारे कागदपत्र दोषारोप पत्रासोबत दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी एकाच गावातील राहणारे आहेत. फिर्यादी व आरोपी यांचे एन.सी. प्रकरण पोलिस स्टेशन मध्ये दाखल होते किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आमच्यावर राजकीय दबाव आणून आरोपीचे नाव या गुन्ह्यामध्ये गोवण्यास आम्हाला भाग पाडले. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र पाठवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या माहितीच्या आधारे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2025.12.09 15:13:41 +0530

**( डा. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालापूर.
दिनांक - ०९/१२/२०२५